# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## जानेवारी
## २०२५

# ई वार्ता




**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ★ | Post Graduate Institute | 01 |
| ✿ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✹ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ✪ | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| 8 | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२७६९/२०२५

मफुकृवि ई वार्ता
जानेवारी २०२५

वर्ष :७, अंक क्रं. : ४९, जानेवारी, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## दुःखद अंतकरणाने मा. कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांना निरोप




**राहुरी, दि. २९ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील यांचे अल्पशा आजाराने दि. २९ जानेवारी, २०२५ रोजी पहाटे पुण्यामध्ये निधन झाले. कुलगुरुंच्या पश्चात त्यांची पत्नी व दोन मुले आहेत. त्यांचे असे अचानक जाण्यामुळे कृषि विद्यापीठामध्ये शोकाकुल वातावरण झाले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा कुलगुरुपदाचा पदभार सांभळण्यापूर्वी त्यांनी मुंबई येथील केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या (सिर्कोट) संचालक पदाची व तंत्रज्ञान हस्तांकरण प्रमुख ही महत्वाची पदे भुषवली आहेत. काही काळ त्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील प्रभारी कुलगुरू या पदाचा देखील कारभार सांभाळला होता. कृषि क्षेत्रातील संशोधन व विस्तार उपक्रमातील सेवेचा त्यांना ३३ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव होता. ४ पुस्तके, १९९ संशोधनात्मक पेपर, तांत्रिक शिक्षणासंबंधीची १४ पुस्तके व १ पेटंन्ट त्यांच्या नावावर जमा आहे.

राहुरी कृषि विद्यापीठामध्ये कुलगुरु पदाची धुरा सांभाळल्यानंतर त्यांनी सुयोग्य निर्णय घेऊन शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यात विद्यापीठाला नावलौकिक मिळवून दिला. त्यांच्या कुशल नेतृत्वामुळे विद्यापीठाला नुकतेच उत्कृष्ट 'ए' ग्रेड मानांकन प्राप्त झाले आहे. कर्मचारी, अधिकारी व शेतकऱ्यांच्या हिताचे बरेचसे निर्णय त्यांनी घेतले. यामध्ये विद्यापीठातील कर्मचाऱ्यांकरिता कारकीर्द प्रगती योजना, १२/२४ आश्वासित प्रगती योजना, कर्मचाऱ्यांच्या सोयीस्कर पदस्थापना, अनुकंपा भरती, सेवानिवृत्ती लाभ व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सुधारित निवृत्तीवेतन, विद्यापीठ प्रकल्पग्रस्तांची जाहिरात या गोष्टींचा समावेश आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठामध्ये नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्प सुरू करण्यात आले. कार्यतत्परशैली, पारदर्शकता व योग्य निर्णयासाठी ते प्रसिद्ध होते. त्यांच्या या अचानक निधनामुळे विद्यापीठामध्ये शोकाकुल वातावरण झाले आहे. त्यांना विद्यापीठाचे मा. प्रभारी कुलगुरू डॉ. साताप्पा खरबडे, संचालक संशोधन डॉ. विठ्ठल शिर्के, संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव डॉ. नितीन दानवले, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद डोखे यांनी तसेच विद्यापीठाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १० जिल्ह्यातील सर्व कार्यालयांनी त्यांना श्रध्दांजली वाहिली.

सकाळी ८.३० वाजता त्यांचे पार्थिव पुणे कृषि महाविद्यालय येथे अंत्यदर्शनासाठी आणण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष श्री. तुषार पवार, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे प्रभारी कुलगुरू डॉ. सात्तापा खरबडे, आनंद कृषी विद्यापीठ व कामधेनू विद्यापीठ, गुजरात चे माजी कुलगुरू प्रा. एम.सी. वार्ष्णेय, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शंकरराव मगर, विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ. विठ्ठल शिर्के, पुणे कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, कृषी विभागाचे संचालक, कृषी प्रक्रिया व नियोजन श्री. विनयकुमार आवटे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. नितीन दानवले, विद्यापीठाचे नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद डोखे, अध्यक्ष, भारतीय किसान संघ, महाराष्ट्र प्रदेश श्री. चंदन पाटील, महात्मा फुले कृषी विद्यापीठ पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. पी. एल. पाटील, माजी विभागप्रमुख कृषी अभियांत्रिकी डॉ. पिंगळे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे विभाग प्रमुख, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध संशोधन केंद्रे व महाविद्यालये तसेच पुणे कृषी महाविद्यालयातील प्राध्यापक, शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी जड अंतःकरणाने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या वेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या ३६ महाराष्ट्र बटालियन ने त्यांना मानवंदना दिली.

## विद्यापीठ कर्मचारी समन्वय संघाकडून मा. कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांचा भव्यदिव्य सत्कार सोहळा संपन्न

**दि. ६ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कर्मचाऱ्यांकरिता कारकीर्द प्रगती योजना, विविध पदोन्नतीचे आदेश, १२/२४ आश्वासित प्रगती योजना, कर्मचाऱ्यांच्या सोयीस्कर पदस्थापना, अनुकंपा भरती, सेवानिवृत्ती लाभ व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सुधारित निवृत्तीवेतन, विद्यापीठ प्रकल्पग्रस्तांची जाहिरात याबाबतीत मा. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी तत्परतेने निर्णय घेऊन सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे प्रश्न मार्गी लावले. मा. कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी बऱ्याच वर्षांपासून विविध प्रकारच्या प्रलंबित प्रश्न सोडविल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यासाठी ऋणनिर्देश सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. यावेळी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, कुलसचिव डॉ. नितीन दानवले, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, महात्मा फुले कृषि विद्यापीठ कर्मचारी समन्वय संघाचे अध्यक्ष डॉ. संजय कोळसे व उपाध्यक्ष डॉ. उत्तम कदम उपस्थित होते.यावेळी सत्काराला उत्तर देताना मा. कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील बोलत





होते.विद्यापीठाच्या स्वतःच्या तसेच विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अपुऱ्या मनुष्यबळाअभावी हे विद्यापीठ चालवणे ही एक तारेवरची कसरत आहे. विद्यापीठात काम करत असताना मी आतापर्यंत नेहमी अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले. त्यांच्या बऱ्याचशा मागण्या खूप वर्षांपासून प्रलंबित होत्या. त्या मागण्या सोडविण्याचा प्रयत्न केला. विद्यापीठाने आतापर्यंत केलेल्या शिक्षण, संशोधन व कृषि विस्तारच्या उत्कृष्ट कामामुळे विद्यापीठाला 'ए' ग्रेड मानांकन मिळाले. विद्यापीठातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी दिलेल्या योगदानामुळेच विद्यापीठाचा नावलौकिक होत आहे. असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी केले.

कर्मचारी हिताच्या निर्णयामध्ये सहाय्यक प्राध्यापक व त्यावरील पदे तसेच ब वर्ग अधिकारी यामध्ये उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव व सुरक्षा अधिकारी यामध्ये १४० पदोन्नती व १६८ वेतन निश्चितीची प्रकरणे मार्गे लावण्यात आली. कारकीर्द प्रगती योजनेमध्ये एकूण ३१० प्रकरणे निकाली काढली गेली. सन २०२१ ते सन २०२४ या कालावधीमध्ये गट ब ते ड मधील सरळसेवेने ६१ व पदोन्नती अंतर्गत ४५० याप्रमाणे एकूण ५११ पदे भरण्यात आली. सन २०२४ मध्ये सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार एकूण २१९९ इतक्या कर्मचाऱ्यांना लाभ मंजूर करण्यात आले. त्यामुळे मा. कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांचा भव्यदिव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन विद्यापीठ कर्मचारी समन्वय संघाकडून करण्यात आले होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले विद्यापीठाला दूरदृष्टी असणारे नेतृत्व लाभले आहे म्हणून विद्यापीठाचा नावलौकिक झाला आहे. कुलगुरुंनी कर्मचारी हितार्थ कल्याणकारी निर्णय घेतले आहे. प्रामाणिकपणे काम करणारे कर्मचाऱ्यांच्या पाठीशी उभे राहणारे कुलगुरू आपल्याला भेटले आहेत. डॉ. विठ्ठल शिर्के आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की मा.कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांच्या कार्यकाळात आपणा सर्वांना काम करायला मिळाले. या विद्यापीठासाठी काही योगदान देता आले, हे आपल्या सर्वांचे भाग्य आहे. हे कुलगुरु दातृत्वाचे मूर्तिमंत उदाहरण आहे. असेच कुलगुरू सर्व विद्यापीठांना लाभावेत जेणेकरून तेथे काम करणाऱ्या प्रत्येकाचे कल्याण होईल. डॉ. सातप्पा खरबडे म्हणाले की विद्यापीठातील प्राध्यापकापासून वर्ग ३ व वर्ग ४ पर्यंत अशा सर्व घटकांच्या प्रश्नांबाबत विहित वेळेत योग्य निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना न्याय दिला. यावेळी डॉ. नितीन दानवले, श्री. सदाशिव पाटील, डॉ. विजू अमोलिक, डॉ. संजय कोळसे, श्री. अमित पवार, श्री. सोमनाथ भुजबळ, श्री. निलेश पगारे, श्री. टी. एस. पाटील व श्री. विजय शेडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रमाची पार्श्वभूमी डॉ. उत्तम कदम यांनी सांगितली. याप्रसंगी कर्मचारी समन्वय संघाच्या वतीने तसेच प्रकल्पग्रस्तांच्या वतीने कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न मार्गी लावणाऱ्या प्रशासनातील व नियंत्रक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गणेश मेहत्रे यांनी तर आभार सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्षनाथ शेटे यांनी मानले. यावेळी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड, निम्नस्तर कृषि शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव हिले, हळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे, सर्व विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ प्राध्यापक, कर्मचारी तसेच विद्यापीठ कर्मचारी समन्वय संघाचे सर्व पदाधिकारी, तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यातील संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## शाश्वत शेती आणि उपजीविकेच्या सुरक्षेसाठी मृदा व्यवस्थापन या विषयावर राज्यस्तरीय दोन दिवसीय परिसंवादाचे आयोजन

**दि. ९ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथील मृदविज्ञान विभागांतर्गत भारतीय मृद विज्ञान संस्था शाखा, राहुरी आणि नाबार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत शेती आणि उपजीविकेची सुरक्षासाठी मृदा व्यवस्थापन या विषयावर राज्यस्तरीय दोन दिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन आदर्श गाव संकल्प आणि प्रकल्प समितीचे कार्याध्यक्ष पद्मश्री डॉ. पोपटराव पवार हे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. संजय भावे, नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे मृदा व जल व्यवस्थापन विभागाचे मा. सहाय्यक महासंचालक डॉ. ए. वेलमुरुगन, पुणे येथील नाबार्डचे मा. मुख्य महाप्रबंधक डॉ. रश्मी दरड, नागपूर येथील राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण व जमीन नियोजनाचे संचालक डॉ. एन.जी. पाटील, अकोला कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक आणि नवी दिल्ली येथील भारतीय मृद विज्ञान संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. व्ही.के. खर्चे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे, मृदविज्ञान विभाग प्रमुख आणि भारतीय मृद विज्ञान संस्था, राहुरी शाखेचे अध्यक्ष डॉ. भीमराव कांबळे व्यासपीठावर उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
जानेवारी २०२५

वर्ष :९, अंक क्रं. : ४९, जानेवारी, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी







यावेळी मा. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की हवामान बदलामुळे कमी दिवसात जास्त पाऊस पडत आहे. या कमी कालावधीतील पडणाऱ्या जास्त पावसामुळे जमिनीची धुप होत आहे. विविध कारणांमुळे जमिनीची सुपीकता कमी होवून जमिनीचे आरोग्य खालवत आहे. संयुक्त राष्ट्राच्या अन्न आणि कृषि संघटनेची मागिल वर्षाचा जागतीक मृदा दिनाची संकल्पना मातीची काळजी–मापन, निरिक्षण आणि व्यवस्थापन यावर आधारीत होती. जमीन सुपीक तर त्यामधुन मिळणारे अन्न हे सकस राहिल. सकस अन्न मिळाले तर आपण सुदृढ राहु.

प्रमुख मार्गदर्शन कदतांना पद्मश्री डॉ. पोपटराव पवार म्हणाले अन्नाचे दूर्भीक्ष होते त्यावेळी हरितक्रांती झाली आणि उत्पादन वाढले. पण यामुळे जमिनीचे आरोग्य खालावले. निसर्गाचा आणि जमिनीचा ऱ्हास इतका झाला आहे की यामुळे आपले आरोग्य धोक्यात आले आहे. पंजाबसारखी कॅन्सर रेल्वे आता प्रत्येक राज्यात सुरु होण्याच्या स्थितीत आहे. यासाठी जे निसर्गातून आपण घेतले आहे ते निसर्गाला येत्या २५ वर्षात दिले तरच आपण जगू. यासाठी जमिनीची काळजी घेवून माती संवर्धन करणे हे अत्यावश्यक झाले आहे. याप्रसंगी अकोला कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख, दापोली कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. संजय भावे, मा. सहाय्यक महासंचालक डॉ. ए वेलमुरुगन, सौ. रश्मी दरड व डॉ. एन.जी. पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात मातीचे पुजन करुन करण्यात आली. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक विभाग प्रमुख डॉ. भिमराव कांबळे यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध पुस्तके व घडीपत्रिकांचे विमोचन करण्यात आले. यावेळी भारतीय मृद विज्ञान संस्थेचा मानाचा समजला जाणारा उषा झेंडे पुरस्कार–२०२४ डॉ. अनिल दुरगुडे यांना तर मृदगंध पुरस्कार–२०२४ डॉ. नितीनकुमार रणशुर यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई आणि आभार डॉ. रितू ठाकरे यांनी मानले. या दोन दिवसीय राज्यस्तरीय परिसंवादामध्ये राज्यातून ३५० शास्त्रज्ञ, विद्यार्थी तसेच उद्योजक व शेतकरी सहभागी झाले होते. या दोन दिवसीय परिसंवादात बदलत्या हवामान परिस्थितीमध्ये मृदा व्यवस्थापन, माती व पाणी संवर्धन, जमिनीतील जैवविविधता, डिजिटल सॉईल सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्तेचा मृदविज्ञानामध्ये वापर करणे, सेंद्रिय शेती, काटेकोर शेती, क्षारयुक्त जमिनींचे व्यवस्थापन, मृद सर्वेक्षण व भूमि नियोजन व माती मृदव्यवस्थापना संदर्भातील धोरणात्मक निर्णय या विषयावर झालेले संशोधन याविषयीचे सादरीकरण करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय मृद विज्ञान संस्था राहुरी शाखेचे अध्यक्ष डॉ. भिमराव कांबळे, सचिव डॉ. रितु ठाकरे, खजिनदार डॉ. श्रीगणेश शेळके यांनी परिश्रम घेतले.

## मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे चर्चाचत्र व प्रक्षेत्र भेट संपन्न



**दि. ३ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे नव्याने प्रसारीत झालेल्या ऊसाच्या सुधारीत वाणांची तांत्रिक माहिती होण्याकरीता ऊसाच्या सुधारीत वाणांची ओळख या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र व प्रक्षेत्र भेट कार्यक्रमाचे आयोजन मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे करण्यात आले होते. यावेळी झालेल्या चर्चासत्राच्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र सरकाळे, पुणे





येथील वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे कार्यकारी संचालक श्री. अजित चौगुले, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. जीवाजीराव मोहिते, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. नितीन दानवले, पाडेगाव ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे आणि पाडेगावचे सरपंच श्री. राहुल कोकरे उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील म्हणाले की देशातील उसाच्या क्षेत्रापैकी महाराष्ट्र राज्यात ऊसाचे १८ टक्के क्षेत्र असून ३२ टक्के उत्पादन आहे. राज्यामध्ये ८६ टक्के क्षेत्र हे पाडेगाव संशोधन केंद्राने विकसित केलेल्या वाणांच्याखाली आहे. पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र हे साखर कारखान्यांची, शेतकर्यांची आणि कृषि विद्यापीठाची शान आहे. या संशोधन केंद्रातून ऊसाचे आतापर्यंत १७ वाण आणि ११० शिफारशी प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत. या ऊसाच्या वाणांमुळेच साखर कारखाने सक्षमपणे सुरू आहेत आणि ऊस उत्पादक शेतकर्यांची आर्थिक प्रगती झाली आहे. हे सर्व श्रेय ऊस वाण निर्मिती करणार्या शास्त्रज्ञांना जाते. ज्या राष्ट्रात शास्त्रज्ञांचा सन्मान होतो त्याच राष्ट्राची प्रगती वेगाने होते. आपण सध्या हवामान बदलास सामोरे जात आहोत. या हवामान बदलाला तग धरणारे असे ऊसाचे वाण फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७ व फुले ऊस १५००६ वाण या संशोधन केंद्राने विकसित केले आहेत. हे वाण जास्तीत जास्त ऊस उत्पादक शेतकर्यांपर्यंत जाण्यासाठी साखर कारखान्यांचे ऊस विकास अधिकारी, मुख्य शेतकी अधिकारी यांनी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी श्री. अजित चौगुले म्हणाले की, या ऊस संशोधन केंद्राने ऊसावर केलेल्या संशोधनाचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे. या संशोधन केंद्राचे बळकटीकरण करण्यासाठी सर्व कारखान्यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. डॉ. राजेंद्र सरकाळे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, सहकारी बँक व साखर कारखाने यांनी सहकाराचे नाते जपल्यामुळे ऊस उत्पादक शेतकर्यांचा फायदा झालेला आहे. ऊसामध्ये भविष्यात क्रांती होण्याची अपेक्षा पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्रामध्ये होत असलेल्या संशोधनातून दिसत आहे. यांप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के म्हणाले की फुले ०२६५ आणि को ८६०३२ या वाणांना समतुल्य वाण फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७ व फुले ऊस १५००६ या संशोधन केंद्राने प्रसारीत केले आहे. हे वाण जास्तीत जास्त शेतकर्यांपर्यंत जाण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते आधुनिक ऊस उत्पादन तंत्रज्ञान या पुस्तिकेचे आणि ऊस तंत्रज्ञानावर आधारीत दहा घडीपित्रीकेंचे विमोचन करण्यात आले.

यावेळी मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगावचे प्रमुख डॉ. राजेंद्र भिलारे यांनी तांत्रिक सत्रामध्ये ऊसाचे नवीन वाण फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७ व फुले ऊस १५००६ यांची माहिती दिली. हे वाण फुले ०२६५ आणि को ८६०३२ या वाणांपेक्षा कसे सरस आहेत हे सांगितले. या प्रसंगी उपस्थितांच्या प्रश्नांना पाडेगाव ऊस संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांनी उत्तरे देवून त्यांच्या शंकांचे निरसन केले. डॉ. सुरेश उबाळे, डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके आणि डॉ. सुरज नलावडे यांनी तांत्रिक सत्रामध्ये उपस्थितांना मार्गदर्शन केले. सकाळच्या सत्रामध्ये साखर कारखान्यांच्या अधिकार्यांनी फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७ व फुले ऊस १५००६ प्रक्षेत्रांना भेटी दिल्या. भेटी दरम्यान डॉ. दत्तात्रय थोरवे, डॉ. किरणकुमार ओंबासे, श्री. अनिल डुबल व श्री. अंकुश भोसले यांनी कारखान्यांच्या अधिकार्यांना माहिती दिली. या चर्चासत्रासाठी महाराष्ट्रातील ६० हून अधिक साखर कारखान्यांचे १०० हून अधिक कार्यकारी संचालक, ऊस विकास अधिकारी आणि शेतकी अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. दत्तात्रय थोरवे यांनी तर आभार डॉ. कैलास काळे यांनी केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दि. २६ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यांप्रसंगी मा. प्रभारी कुलगुरु डॉ. साताप्पा खरबडे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना मा. प्रभारी कुलगुरु डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की अकोला विद्यापीठात झालेल्या ५२ व्या संयुक्त कृषि शिक्षण व संशोधन समितीच्या बैठकीमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे ६ नविन वाण, ५ कृषि अवजारे व ९२ तंत्रज्ञान शिफारशी प्रसारीत करुन उच्चांक केला आहे. विद्यापीठाने आत्तापर्यंत संशोधन, शिक्षण व विस्तार कार्यामध्ये केलेल्या भरीव कामगिरीमुळे भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने पुढील पाच वर्षांसाठी अधिस्विकृती देवून विद्यापीठाला उत्कृष्ट 'अ' मानांकन देवून गौरविले आहे. नवी दिल्ली येथील भारतीय वाणिज्य आणि उद्योग महासंघाने (फिक्की) महात्मा फुले कृषि विद्यापीठास या वर्षाचा सर्वोत्कृष्ट विद्यापीठ-२०२४ या पुरस्काराने गौरविले आहे. शेतीच्या सिंचन पध्दतीसाठी सौर उर्जा उपयोगी ठरु शकते या विषयावर लक्ष केंद्रीत करुन जबलपूर येथील बिसा केंद्रामध्ये विद्यापीठाने २०० पेक्षा जास्त अधिकारी, विद्यार्थी व शेतकरी यांना सोलरवरील प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्याची संधी दिली आहे. विद्यापीठाने विविध विस्तार उपक्रमांच्या माध्यमातून कृषि तंत्रज्ञान लोकाभिमुख करण्यासाठी प्रयत्न केले आहेत त्यामध्ये विभागीय व जिल्हा विस्तार केंद्रे, कृषि विज्ञान केंद्रे यांच्या माध्यमातून गतवर्षी विविध विस्तार उपक्रम राबविण्यात आले. शेतकरी प्रथम प्रकल्पाद्वारे एकात्मिक शेती पध्दतीचे

मफुकृवि ई वार्ता
जानेवारी २०२५









मॉडेल यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. कमी मनुष्यबळ असतांनादेखील विद्यापीठाने कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यामध्ये मोठे योगदान दिले असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. प्रभारी कुलगुरु डॉ. साताप्पा खरबडे यांनी केले.

या कार्यक्रमाला विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संचालक संशोधन डॉ. विठ्ठल शिर्के, कुलसचिव डॉ. नितीन दानवले, नियंत्रकश्री. सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महाविरसिंग चौहान, उपकुलसचिव (प्रशासन) श्री. विजय पाटील, सहाय्यक कुलसचिव (विद्या) श्रीमती स्वाती निकम, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांनी लेफ्टनंट डॉ. फुलसावंगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. आजच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त संचालक राष्ट्रीय सेवा योजना तथा विद्यार्थी कल्याण कार्यालय, पदव्युत्तर कृषि महाविद्यालय व डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व जिल्हा शल्य चिकित्सक, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरासाठी विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली हिले यांनी मदत केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्षनाथ शेटे यांनी केले.

## मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगावला वसंतदादा साखर संस्थेच्या पंचवार्षिक पुर्नविलोकन समितीने दिली भेट





**दि. २५ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे पुणे येथील वसंतदादा साखर संस्थेच्या पंचवार्षिक पुर्नविलोकन समितीने भेट दिली. यावेळी मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे, वसंतदादा साखर संस्थेच्या पंचवार्षिक पुर्नविलोकन समितीचे मा. अध्यक्ष डॉ. सुभाष पुरी, सदस्य डॉ. के.ई. लवांदे, डॉ. व्ही.एम. मायंदे उपस्थित होते. या भेटी दरम्यान डॉ. राजेंद्र भिलारे यांनी ऊस संशोधन केंद्राच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या संशोधनाच्या आढाव्याचे सविस्तर सादरीकरण केले. तसेच प्रक्षेत्रावरील विविध ऊस वाणांच्या प्रात्यक्षिक प्लॉटची पाहणी करताना संशोधन केंद्राने आजपर्यंत विकसित केलेल्या विविध ऊस वाणांची सखोल माहिती डॉ. कैलास भोईटे आणि डॉ. सुरेश उबाळे यांनी दिली. तसेच संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर राबविण्यात येत असलेल्या मुलभूत बिजोत्पादन कार्यक्रमाची माहिती प्रक्षेत्र भेटी दरम्यान घेतली.

डॉ. सुभाष पुरी बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे आर्थिक स्वावलंबन प्राप्त करण्यात पाडेगाव संशोधन केंद्राचा मोठा वाटा आहे. तसेच १९९६ साली प्रसारीत झालेली को ८६०३२ या ऊस वाणांचे देशातील व राज्यातील लागवडीखालील क्षेत्राचा आढावा घेतला असता शेतकऱ्यांच्या दृष्टीने या वाणाचे महत्व अजूनही कमी झालेले नाही. याप्रसंगी डॉ. व्ही.एम. मायंदे, मृदशास्त्र विभागातील डॉ. कैलास काळे, ऊस किटकशास्त्रज्ञ प्रा. शालीग्राम गांगुर्डे, वरीष्ठ संशोधन

सहाय्यक डॉ. दत्तात्रय थोरवे, कनिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. किरणकुमार ओंबासे व डॉ. माधवी शेळके यांचेबरोबर समितीने संवाद साधला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार डॉ. दत्तात्रय थोरवे मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या बियाणे विभागामार्फत आदिवासी पशुपालक शेतकऱ्यांना ओट चारा बियाण्याचे मोफत वाटप





**दि. १ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या बियाणे विभागाच्या आदिवासी उपयोजनेअंतर्गत प्राप्त अनुदानातुन डॉ. हेडगेवार समिती, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार आयोजित १८ व्या कृषि तंत्रज्ञान महोत्सवात पशुपालक परिषदेचे औचित्य साधून आदिवासी पशुपालक शेतकऱ्यांना ओट चारा बियाण्याचे मोफत वाटप करण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कुलसचिव तथा प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. नितीन दानवले यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या पशुपालक परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. हेडगेवार सेवा समितीच्या संचालिका सौ. अर्चनाताई वळवी तर प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त डॉ. तुषार गिते व पशुधन सल्लागार डॉ. महेश गणापुरे उपस्थित होते. यावेळी सौ. अर्चनाताई वळवी यांनी दुग्धव्यवसाय व दुधसंकलन अधिकाधिक करण्याचे आवाहन उपस्थित पशुपालकांना केले. डॉ. तुषार गिते यांनी दुग्धव्यवसाय, शेळी व कुक्कुटपालन व्यवसाय वाढीसाठी मार्गदर्शन केले. यावेळी तांत्रिक मार्गदर्शनात बिजोत्पादन अधिकारी डॉ. कैलास गागरे व बियाणे विपणन अधिकारी डॉ. दिलीप ठाकरे यांनी पशुपालकांना ओट चारा लागवड तंत्रज्ञान या विषयीचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पशुवैद्यकीय विभागाचे विषय विशेषज्ञ डॉ. आदित्य देशपांडे यांनी तर आभार कार्यक्रम सहाय्यक श्री. प्रविण चव्हाण यांनी मानले. या पशुपालक परिषदेसाठी परिसरातून मोठया प्रमाणावर पशुपालक शेतकरी व विविध सेवाभावी संस्थांचे कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन संपन्न





**दि. १० जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागात दि. ६ ते १० जानेवारी, २०२५ दरम्यान बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. यावेळी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, डॉ. बाबासाहेब भिटे, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. भगवान देशमुख उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. गोरक्ष ससाणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की स्वंय रोजगारातुन रोजगाराची निर्मिती करुन मुल्यवर्धीत बेकरी पदार्थ समाजातील वेगवेगळ्या वयोगटातील व्यक्तींना उपलब्ध करुन द्यावेत. उत्कृष्ट प्रतीच्या कच्च्या मालाची निवड, गुणवत्ता बेकरी व्यवसाय स्वच्छता, पॅकींग इ. बाबींवर विशेष भर दिल्यास बेकरी उद्योजकांना आपला स्वतःचा ब्रॅन्ड निर्माण करता येईल. प्रास्ताविक करतांना डॉ. विक्रम कड यांनी विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांची रुपरेषा व

महत्व विषद केले. या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींना ब्रेड, बटर, खारी, टोस्ट, नानकटाई, लादीपाव, बनपाव, नाचणी बिस्कीट, क्रीमरोल व आयुर्वेदिक कुकिज हे बेकरी पदार्थ तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राहुल घुगे तर आभार डॉ. बाबासाहेब भिटे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती सविता धनवटे, श्री. पोपट खर्से, श्री. गोरक्षनाथ चौधरी व श्री. सुभाष माने यांनी परिश्रम घेतले. सदरच्या प्रशिक्षणामध्ये १३ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला.

## आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना चारा पिकांचे बियाणे व कृषि अवजारे वाटप कार्यक्रम संपन्न



**दि. १५ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित चारा पिके संशोधन प्रकल्पाच्या वतीने मौजे– निंबोनी, ता. नवापूर, जि. नंदुरबार येथे बियाणे व कृषि अवजारे वाटप कार्यक्रम घेण्यात आला. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी चारा पिके संशोधन प्रकल्पाचे शास्त्रज्ञ डॉ. संदीप लांडगे, नंदुरबार कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. आदित्य देशपांडे व चारा पिके प्रकल्पातील कनिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. दीपक पालवे यावेळी उपस्थित होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात चारा पिके संशोधन प्रकल्पाच्या आदिवासी उपयोजनेअंतर्गत प्राप्त अनुदानातून आदिवासी शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील ओट व बरसिम या चारा पिकांचे बियाणे व मनुष्यचलित सायकल कोळपे तसेच कृषिदर्शनींचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योजनेतील अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी निंबोणी व श्रावणी गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील,कृषि सहाय्यक श्री. सुहास भालेराव, श्री. अरुण कदम, श्री. योगेश पाडवी तसेच प्रगतिशील शेतकरी व या योजनेत लाभ मिळालेले ३० लाभार्थी आदिवासी शेतकरी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात शेळीपालनावरील तीन दिवसीय प्रशिक्षण वर्ग संपन्न



**दि. १८ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील अखिल भारतीय समन्वित शेळी सुधार प्रकल्पाच्या वतीने शाश्वत शेळीपालन तंत्र या विषयावरील तीन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील शेळीपालकांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी तसेच शाश्वत व व्यावसायिक शेळीपालनाबाबत, नवनवीन तंत्रज्ञानाबाबत सजगता निर्माण व्हावी या हेतूने महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व विभाग प्रमुख डॉ. दिनकर कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली अशा प्रकारचे प्रशिक्षणे आयोजित करण्यात येत आहेत. या प्रशिक्षण वर्गाच्या समारोपप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी संशोधन उपसंचालक डॉ. बाळासाहेब पाटील, प्रकल्पाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रशिक्षण समन्वयक डॉ. विष्णू नरवडे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्रनाथ निमसे व डॉ. अमर लोखंडे उपस्थित होते.

यावेळी डॉ. बाळासाहेब पाटील मार्गदर्शन करताना म्हणाले की शेतकऱ्यांनी विद्यापीठामार्फत दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन आपला शेळीपालन व्यवसाय फायदेशीर करून जास्तीत जास्त नफा मिळवावा. शेळीच्या दुधाला अनन्य साधारण असे औषधी महत्त्व आहे. त्याचा उपयोग शेळीपालकांनी आपल्या शेळीपालनाच्या व्यवसायात जास्तीत जास्त करून घ्यावा. सदरच्या प्रशिक्षणात डॉ. समीर ढगे, डॉ. दिलीप देवकर, डॉ. महेंद्र मोटे, डॉ. योगेश कांदळकर, डॉ. रवींद्र निमसे, डॉ. अमर लोखंडे व डॉ. विष्णू नरवडे या शास्त्रज्ञांनी शास्त्रोक्त पद्धतीने पैदास, आहार व आरोग्य व्यवस्थापन, पशुधनासाठी चारा व्यवस्थापन तसेच शेळीच्या दुधाचे गुणधर्म व मूल्यवर्धन, अझोला व गांडूळ खत निर्मिती यासंबंधी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये डॉ. विष्णू नरवडे यांनी आतापर्यंत २४ प्रशिक्षणांद्वारे ९१८ प्रशिक्षणार्थ्यांनी अशा प्रकारच्या प्रशिक्षणाचा लाभ घेतल्याचे सांगितले. याप्रसंगी प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षण पुस्तिका व प्रमाणपत्र देण्यात आले. सदरच्या प्रशिक्षणामध्ये एकूण ३० प्रशिक्षणार्थ्यांनी भाग घेतला. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. संदीप पवार, श्री. गौरव घोलप व श्री. रमेश कलापुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या स्टॉलला बारामती येथील कृषिक २०२५ प्रदर्शनात शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद



**दि. २० जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले कृषि विद्यापीठाने बारामती येथील कृषिक–२०२५ प्रदर्शनात सहभाग घेऊन काटेकर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स प्रकल्पाने तयार केलेले नाविन्यपूर्ण अविष्कार प्रदर्शित केले असून या प्रात्यक्षिकांना शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. कृषि विद्यापीठाच्या या प्रदर्शन स्टॉलला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. अजित पवार, कृषिमंत्री मा.ना.ॲड. माणिकराव कोकाटे, पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री मा.ना. पंकजा मुंडे, मा.आ.श्री. रोहित पवार आणि विविध मान्यवरांनी भेटी दिल्या. विद्यापीठाने या प्रदर्शनात ड्रोन व दूरस्थपणे चालणारा फवारणी फुले रोबोट, हायपरस्पेक्टरल इमेजिंगचा शेतीसाठी वापर, फुले स्मार्ट हवामान केंद्र,आयोटी सक्षम मृद ओलावा संवेदक आणि फुले मृदा ओलावा संवेदक आधारित सिंचन वेळापत्रक प्रणाली या तंत्रज्ञानाच्या प्रात्यक्षिकांचा समावेश होता. यावेळी काटेकर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स सहप्रमुख संशोधक तथा सहयोगी प्राध्यापक डॉ. सोमनाथ माने, डॉ. वैभव माळुंजकर, डॉ. गिरीशकुमार भणगे, इंजि. निलकंठ मोरे, श्री. सौरभ भडांगे, श्री. अजिंक्य आढाव आणि श्री. प्रशांत पानसंबळ यांनी मान्यवरांना व उपस्थित शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाबद्दल माहिती दिली. सदर प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे आणि कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख तथा काटेकर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स प्रमुख संशोधक डॉ. सुनील कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विविध नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक व प्रदर्शनाचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील चिक्कू फळाला मिळाला उच्चांकी दर

**दि. २३ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील उद्यानविद्या विभागातील चिक्कू फळांच्या विक्रीतून एकूण ४० लाखांचा महसूल विद्यापीठास प्राप्त झाला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत चिक्कू फळापासून मिळणाऱ्या महसुलात २३ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. विद्यापीठातील उद्यानविद्या विभागाच्या प्रक्षेत्रावर कालीपत्ती, क्रिकेट बॉल इ. चिक्कू वाणांची दहा हेक्टर क्षेत्रावर चिक्कू फळबागा असून त्यात एकूण उत्पादनक्षम ९७२ फळझाडे आहेत. सदर फळांची विक्री ई निविदा पद्धतीने नुकतीच करण्यात आली. चिक्कू फळांचे आहारातील वाढते महत्त्व लक्षात घेता दिवसेंदिवस ग्राहकांकडून चिक्कू फळांची मागणी बाजारात मोठ्या प्रमाणात वाढत आहे. विद्यापीठातील चिक्कूची फळे गुणवत्ता तसेच चवीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. त्यामुळे विद्यापीठातील चिक्कू फळबागा घेण्यासाठी यावर्षी व्यापाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. विद्यापीठातील चिक्कू फळबागांचे बारमाही व्यवस्थापन हे तांत्रिक व शास्त्रोक्त पद्धतीने केले जाते. याबाबत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. फळबागेचे योग्य व्यवस्थापन तसेच अधिक उत्पादनासाठी उद्यानविद्या प्रक्षेत्राचे प्रभारी अधिकारी डॉ. सचिन मगर, सहाय्यक उद्यानविद्यावेत्ता तसेच कनिष्ठ संशोधन सहाय्यक

वर्ष :५, अंक क्रं. : ४९, जानेवारी, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी



श्री. विजय पवार आणि श्री. राहुल पाटील, कृषि सहाय्यक श्री. रमेश अनाप, श्री. सचिन शेळके, श्री. बाबासाहेब होडगर तसेच उद्यान विद्या विभागाचे सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राने दिली गो–पर्यटनाची संधी



**दि. २८ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या पुणे कृषि महाविद्यालयाच्या मरीआई गेट येथील पशुसंवर्धन व दुग्धशाख विभागामध्ये देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राने गो–पर्यटनाची संधी उपलब्ध करून दिली आहे. या केंद्रात २५ जानेवारीपासून गो–पर्यटनास सुरुवात झाली असून, देशी गोवंशांचे महत्त्व, त्यांचे वर्गीकरण व उपयुक्तता, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राची उद्दिष्टे, चालू असलेले संशोधन व इतर कार्य या विषयी पर्यटकांना अवगत केले जाते. भारतातील ११ देशी गोवंश एकत्र एका ठिकाणी पाहण्याची व माहिती करून घेण्याची संधी उपलब्ध करून देणारी गो–परिक्रमा प्रत्येकाने अनुभवावी अशी आहे. शिवाय सर्व पर्यटकांना देशी गायींची वासरे, कालवडी व गार्याच्या वात्सल्यपूर्ण सहवासात वेळ घालवून स्वतःच्या ताण–तणावातून सुटका करून घेण्याची संधी मिळते.

दुधासाठी प्रसिद्ध असणाऱ्या साहिवाल, गीर, लाल सिंधी, धारपारकर व राठी या पाचही दुधाळ गोवंशांच्या जातिवंत गायी व वळूचे कळप भारताच्या कानाकोपऱ्यांतून एकत्र करून येथे जोपासले असून, देशातील हे एकमेव केंद्र आहे. येथे महाराष्ट्रातील खिलार, कोकण कपिला, डांगी, देवणी, लाल कंधारी व गौळाऊ या गायींच्या जातींबरोबरच आंध्र प्रदेशातील लहान आकाराकरिता प्रसिद्ध असणारी पुंगनूर व मिनिएचर पुंगनूर गायी देखील उपलब्ध आहेत. या ठिकाणी लहान मुलांना चित्रात दिसणाऱ्या गायीची प्रत्यक्ष ओळखही होणार आहे. शहरातील मुलांना चित्रात दिसणारी गाय आता प्रत्यक्ष पाहण्याची व तिची ओळख करून घेण्याची संधी राज्य सरकारच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या येथील पुणे कृषि महाविद्यालयाने गो–पर्यटनातून सशुल्क उपलब्ध करून दिली आहे. एवढेच नाही, तर पर्यटकांना गायी–वासरांना ओला, हिरवा चारा, कडबा–वैरण, सुग्रास–पशुखाद्य, गूळ–डाळ असे गायींना पोषक पदार्थ खाऊ घालता येणार असल्याने शहरात गोकूळ अवतरल्याचा अनुभव व आनंदही मिळणार आहे.

देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख डॉ. सोमनाथ माने यांनी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रातील गो–पर्यटन सशुल्क असून, केवळ ते पाहण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना प्रवेश फी १० रुपये, इतर पर्यटकांना २० रुपये आहे. पर्यटकांना प्रशिक्षण व प्रत्यक्ष अनुभवासाठी अर्ध्या दिवसासाठी ६०० रुपये आणि पूर्ण दिवसासाठी एक हजार रुपये आहे. गो–पर्यटन उपक्रम शहरी व ग्रामीण लोकांसाठी सुखद अनुभव ठरणार आहे असे सांगितले.

मफुकृवि ई वार्ता
जानेवारी २०२५

वर्ष :९, अंक क्र. : ४१, जानेवारी, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## अंजीर आणि सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी येथे अंजीर व सिताफळ कार्यशाळेचे आयोजन





**दि. १५ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपिके अंजीर आणि सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी येथे कृषि विज्ञान केंद्र बोरगाव, आत्मा, सातारा व अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपिके अंजीर आणि सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी यांच्या संयुक्त विद्यमाने अंजीर व सिताफळ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. प्रदीप दळवे डॉ. बालगुडे विषय विशेषज्ञ प्रा.भूषण यादगीरवार झेंडेवाडी येथील पुरंदर लक्ष्मी महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या फळे व भाजीपाला प्रक्रिया कंपनीच्या अध्यक्षा सौ. संगीता झेंडे उपस्थित होते. सकाळच्या सत्रात डॉ. प्रदीप दळवे यांनी सिताफळ लागवड, बहर व्यवस्थापन, अन्नद्रव्य व्यवस्थापन, योग्य वाणांची निवड याविषयी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. बालगुडे यांनी कीड व रोग व्यवस्थापन तसेच कमी खर्चाचे बोर्डो मिश्रण तयार करण्याबाबत माहिती दिली. दुपारच्या सत्रात अंजीर लागवड, बहर आणि अन्नद्रव्य व्यवस्थापन, वाणांची निवड, कीड व रोग व्यवस्थापन याविषयी तज्ञांनी मार्गदर्शन केले. सादरीकरणानंतर शेतकऱ्यांनी विचारलेल्या शंकांचे निरसन करण्यात आले दरम्यान महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या अंजीर–फुले राजेवाडी आणि सिताफळ–फुले पुरंदर या विस्तार प्रकाशनांचे प्रशिक्षनार्थींना वाटप करण्यात आले. यावेळी श्री. तानाजी धायगुडे, श्री. सुनील डोळस, श्री. भागवतराव देशमुख यांनी सिताफळ पिकातील अनुभव कथन करताना विद्यापीठ शिफारशीत वाणांची लागवड करणे फायदेशीर असलेचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भूषण यादगीरवार यांनी केले तर आभार श्री. मोहन लाड यांनी मानले. यावेळी डॉ. दळवे यांनी सिताफळ झाडांच्या छाटणीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. झेंडेवाडी येथील पुरंदर लक्ष्मी महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या फळे व भाजीपाला प्रक्रिया केंद्रास भेट देणेत आली. यावेळी कंपनीचे संचालक सौ. संगीता झेंडे, श्री. विठ्ठल झेंडे व पूजा फाळके यांनी विविध प्रक्रियायुक्त उत्पादने व कामकाज यावर सविस्तर माहिती दिली. सदरची कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न होणेकरीता श्री. सुनील नाळे व  श्री. संदीप लिंभोरे यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रशिक्षणासाठी सातारा जिल्ह्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

## कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव येथे रोपवाटिका व्यवस्थापन प्रशिक्षण उत्साहात संपन्न



**दि. १३ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव व आत्मा, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विज्ञान केंद्र बोरगाव, ता. जि. सातारा येथे ग्रामीण युवकांसाठी कौशल्य आधारित रोपवाटिका व्यवस्थापन प्रशिक्षण या विषयावर शेतकऱ्यांसाठी ५ दिवसांचे प्रमाणपत्र प्रशिक्षण उत्साहात झाले. यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. महेश बाबर, आत्माचे उपप्रकल्प संचालक श्री. राहुल माने, डॉ. दर्शन कदम, डॉ महेश बाबर व प्रा. भुषण यादगीरवार उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. महेश बाबर यांनी कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

श्री. राहुल माने यांनी रोपवाटिका उभारणीविषयी तसेच श्रीकांत घोरपडे यांनी ऊस रोपवाटिका तंत्रज्ञान व दर्शन कदम यांनी स्ट्राबेरी रोपवाटिका संदर्भात माहिती दिली. या प्रशिक्षणा दरम्यान प्रो ट्रे तंत्रज्ञान वापरून भाजीपाला व ऊस रोपे तयार करणे, फळपिकांच्या कलम बांधण्याचे प्रात्यक्षिक, ठिबक संचाची निवड व देखभाल, संरक्षित गृहाची माहिती तज्ज्ञांनी दिली. विक्रांत गायकवाड, कार्तिक अडसूळ, सौ, वर्षा जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सागर सकटे यांनी तर आभार श्री. संग्राम पाटील यांनी मानले.

## कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव यांच्या वतीने सुधारित जातीच्या जनावरांचे संगोपन प्रशिक्षण संपन्न






**दि. २२ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव व आत्मा सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण युवकांचे कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सात दिवसीय सुधारित जातीच्या जनावरांचे संगोपन या विषयावर प्रशिक्षण पार पडले. विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये राजर्षि छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय कोल्हापूर येथील पशुविज्ञान व दुग्धशास्त्र प्राध्यापक डॉ. शैलेश कांबळे यांनी दुधाळ जनावरांचे व्यवस्थापन व डॉ. महेंद्र यादव यांनी जनावरांचे आजार व उपचार याविषयी मार्गदर्शन केले. कृषि विज्ञान केंद्र, तळसंदे, जिल्हा कोल्हापूर येथील विषय विशेषज्ञ पशुविज्ञान सुधीर सूर्यगंध यांनी सुधारित गोठा व्यवस्थापन व मुक्त संचार गोठा पद्धतीचे फायदे, मोहळ कृषि विज्ञान केंद्र कार्यक्रम समन्वयक यांनी डॉ. तानाजी वळकुंडे लहान, मोठ्या व भाकड जनावरांचे आहार व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळ येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. तेजस शेंडे यांनी दूध उत्पादन क्षमता वाढ होण्यासाठी जनावरांचे पैदास व्यवस्थापण या विषयावर मार्गदर्शन केले. महाराष्ट्र बँकेचे श्री. साबळे यांनी बँकेच्या पशुपालकांसाठी उपयुक्त, वेगवेगळ्या योजनांची माहिती दिली व जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक

नितीन तळपे यांनी कर्ज प्रकरण मंजूर होण्याची, वसुलीची प्रक्रिया व आवश्यक कागदपत्रे यांची माहिती दिली. प्रगतिशील पशुपालक हिरालाल सस्ते यांनी पशुपालनातील अर्थशास्त्र व डॉ. सोनकांबळे यांनी प्रजनन संस्थेतील बिघाड यांची माहिती दिली. पशुधनापासून मिळणाऱ्या शेणखताचे. योग्य व्यवस्थापन व मूल्यवर्धनासाठी जीवामृत बनविणे याविषयी विषय विशेषज्ञ भूषण यादगिरवार यांनी माहिती दिली. एकदल व द्विदल चारा पीक लागवड आणि चारा प्रक्रियाअंतर्गत उन्हाळ्यामध्ये दूध उत्पादनामध्ये होणारी घट टळावी व पौष्टिक चारा मिळण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने मुरघास बनवण्याची कृती याविषयी विषय विशेषज्ञ सागर सकटे यांनी मार्गदर्शन केले. समारोप कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते शेतकऱ्यांना प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या प्रसंगी प्रकल्प संचालक, आत्मा अजय शेंडे यांनी पशुपालकांसाठीच्या शासकीय योजता याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रम समन्वयक डॉ. महेश बाबर यांनी कृषि विज्ञान केंद्राकडून राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती सांगून शेतकऱ्यांना या उपक्रमांमध्ये भाग घेण्याचे आवाहन केले. सात दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव येथील सर्व अधिकारी कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## कोल्हापूर येथील मका संशोधन केंद्राच्या वतीने मका आद्यरेखा प्रात्यक्षिक कार्यक्रम संपन्न

**दि. २ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कसबा बावडा, जि. कोल्हापूर येथील मका संशोधन केंद्र व लुधियाना येथील भारतीय मका संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मका आद्यरेखा प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रेरणास्तोत्र मा. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली मका संशोधन केंद्राचे कार्य सुरु आहे. आद्यरेखा प्रात्यक्षिक कार्यक्रमप्रसंगी बारामती येथील राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. के. सामी रेड्डी, शेंडा पार्क येथील विभागीय संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. अशोक पिसाळ, मका संशोधन केंद्राचे मका पैदासकार डॉ. सुनील कराड, विभागीय संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. प्रवीण गजभिये व डॉ. सुहास भिंगारदिवे उपस्थित होते. यावेळी डॉ. के. सामी रेड्डी मार्गदर्शन करतांना म्हणाले की गगन बावडा येथील मका येथील मका संशोधन केंद्र तसेच कृषि वनस्पतीशास्त्र, कृषि विद्या व कृषि किटक शास्त्र या विषयामधील संशोधन महत्त्वाचे ठरत असून विस्तार कार्यामध्ये भारतीय कृषि अनुसंधान परिषद व यांच्या सहकार्याने मका आद्यरेखा प्रात्यक्षिक कार्यक्रम प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या प्रक्षेत्रावर राबविण्यात येत असतो त्यामुळे तंत्रज्ञान प्रसार कार्य उत्तम आहे तसेच अजैविक ताण प्रतिरोधक मका वाण निर्मितीमध्ये मका



संशोधन केंद्राचे कार्य उल्लेखनीय आहे. संशोधन केंद्राने आतापर्यंत दहा वाण व अनेक शिफारशींची निर्मिती करून शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर वाढविण्यास मदत केली आहे.

यावेळी डॉ. अशोक पिसाळ यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनील कराड यांनी केले. यावेळी डॉ. प्रवीण गजभिये यांनी कोल्हापूर विभागातील मृदेची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुहास भिंगारदिवे यांनी केले. सदरचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वरिष्ठ तंत्रज्ञ डॉ. मयूर सुतार, कृषि सहाय्यक श्री. सागर शेळके, श्री. आशिष पाटील, कु. प्रतीक्षा पाटील, पूजा चव्हाण, भाउसो पोवार, आर्यन टोनपी, स्वप्नील गायकवाड यांनी परिश्रम केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे राष्ट्रीय युवा दिवस उत्साहात साजरा




**दि. १२ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे स्वामी विवेकानंद याची जयंती, राष्ट्रीय युवा दिन तसेच राजमाता जिजाऊसाहेब भोसले यांची जयंती महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी श्री. नामदेव धुर्वे होते. यावेळी श्री. धुर्वे यांनी स्वामी विवेकानंद याच्या जीवनातील विविध बोधप्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय युवा दिन म्हणून का समर्पक आहे हे सांगतांना, स्वामी विवेकानंद यांनी विज्ञान आणि अध्यात्माची सांगड घालून युवकांना जीवनाकडे बघण्याची एक विशेष दृष्टी दिली. स्वामी विवेकानंदांनी त्यांच्या विद्यार्थी दशेत उत्कृष्ट गायक, खेळाडू तसेच इतर बऱ्याच बाबींमध्ये स्वतःला सिद्ध केले होते. या कार्यक्रमासाठी डॉ. सागर बंड व डॉ. कुशल ढाके हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अभिलाषा पथारे हिने तर आभार कु. पलक नवलखे हिने मानले. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# भेटी

## अकोला कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांची कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे सदिच्छा भेट

**दि. ०३ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचा सत्कार केला. या भेटी दरम्यान डॉ. गडाख यांनी महाविद्यालयाचे प्रक्षेत्र, फळ बाग तसेच विविध विभागांना भेट दिली. सोबतच त्यांनी महाविद्यालयाचे अधिकारी



व कर्मचारी यांचेशी सुसंवाद साधला. या भेटी दरम्यान डॉ. संदीप पाटील यांनी महाविद्यालयामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विकास कामांची माहिती आणि महाविद्यालयातील कामकाजाचा आढावा सादर केला. यावेळी डॉ. शरद गडाख यांनी उपस्थितांना संबोधीत करतांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला मध्ये सुरु असलेल्या विविध विकास कामांची माहिती दिली. तसेच विविध पद्धतीने आवश्यक निधी कसा मिळवावा याबद्दल माहिती दिली. तसेच महाविद्यालयाच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करून महाविद्यालयाच्या पुढील वाटचालसाठी शुभेच्या दिल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, डॉ. आर. डी. चौधरी, डॉ. बी. डी. रोमाडे, डॉ. आर. एस. शेख, श्री. एन. जी. धुर्वे, सहा. नियंत्रक श्री. विजय पाटील, डॉ. कुशल ढाके, डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर बंड, डॉ. मनीषा पालवे आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिन साजरा

### कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा





**दि. २६ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या हाळगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयामध्ये ७६ व्या प्रजासत्ताक दिनी सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. अनिल काळे म्हणाले की देशाला प्रजासत्ताक करण्यासाठी आपल्या स्वातंत्र सैनिकांनी अथक परिश्रम केले आहेत. त्यांचे बलिदान आपण कधीही विसरू शकत नाही. प्रजासत्ताक दिन सर्व भारतीयांमध्ये आनंद, उल्हास आणि नवी चेतना भरतो. कोणतेही राष्ट्र महान नसते, त्या देशात राहणार्या देशवासीयांचा प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची इच्छा, सत्यनिष्ठा आणि नैतिकता ई. गोष्टी देशाला महान बनवतात. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विविध पिकांचे सुधारित वाण, संशोधन शिफारसी आणि कृषि यंत्रे तयार करून प्रसारीत केली आहेत. त्याचा फायदा शेतकरी बांधवांनी घ्यावा. तसेच, हवामान आधारित पीक पद्धती, शेतीसाठी ड्रोन तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, बौद्धिक क्षमता ई. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा असा सल्ला त्यांनी दिला.

यावेळी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात डॉ. रोहन जाधव, पथक प्रमुख, रक्तकेंद्र, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर व त्यांच्या सहकाऱ्यांनी ३५ रक्तदात्यांचे रक्त नमुने गोळा केले. कार्यक्रमादरम्यान, महाविद्यालयाचे प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, प्रतिष्ठित ग्रामस्थ इत्यादींनी महाविद्यालयाच्या प्रयोगशाळा, रोपवाटिका व गांडूळखत उपक्रमास भेटी दिल्या. याप्रसंगी कार्यक्रमास विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय सोनावणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. पोपट पवार, डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. गोकुळ वामन, डॉ. मनोज गुड, डॉ. निलेश लांडे, डॉ. महेश निकम, डॉ. अंबादास मेहेत्रे, डॉ. निकिता धाडगे, डॉ. उत्कर्षा गवारे, अर्चना महाजन, डॉ. किरण चौधरी, डॉ. प्रणाली ठाकरे, डॉ. दिपक वाळुंजकर शिक्षकेतर कर्मचारी श्री. संजय आढाव, श्री. अमृता सोनावणे, श्री. संभाजी

ठवाळ, श्री. महेश सुरवसे, श्री. प्रदिप धारेकर, श्री. किरण अडसुरे, श्री. शशी कांबळे, श्री. संजय सोनवणे पत्रकार श्री. सत्तार शेख व प्रगतशील शेतकरी तसेच ग्रामस्थ, विद्यार्थी व सुरक्षा रक्षक उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, प्रा. पोपट पवार, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, डॉ. निलेश लांडे, प्रभारी सहाय्यक प्राध्यापक शारीरिक शिक्षण यांनी विशेष मेहनत घेतली.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे ७६ वा प्रजाकसत्ताक दिन उत्साहात साजरा





**दि. २६ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे ७६ वा प्रजाकसत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर्व उपस्थित अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच विद्यार्थ्यांनी संविधान उद्देशीकेचे वाचन केले. या प्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप पाटील यांनी संविधानाचा इतिहास सांगितला. भारताचे संविधान हे जगात सर्वात श्रेष्ठ असल्याचे यावेळी ते म्हणाले. तसेच महाविद्यालयात कमी अधिकारी व कर्मचारी असतांना देखील महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर समाधानकारक कामगिरी करत आहे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, डॉ. आर.डी. चौधरी, डॉ. बी. डी. रोमाडे, डॉ. आर. एस. शेख, श्री. एन. जी. धुर्वे, डॉ. कुशल ढाके, डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर बंड, श्री. सागर पाटील, डॉ. मनीषा पालवे आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

# जयंती साजरी

## सावित्रीबाई फुले यांची जयंती कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फार्म येथे उत्साहात साजरी





**दि. ३ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फार्म येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्या सौ. सुवर्णा नवसूपे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या सौ. विद्या वाबळे उपस्थित होत्या. यावेळी कनिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. एस.ए. चौधरी, श्री. पी.डी. वणवे, श्रीमती. एम.एम. खैरे, सौ. पी.एस. वैरागर उपस्थित होते. यावेळी सौ. सुवर्णा नवसूपे मार्गदर्शन करतांना म्हणाल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा आपल्याला समानतेची आणि शिक्षणाचा मार्ग दाखवते. आपण सर्वांनी सावित्रीबाईच्या विचारांना आत्मसात करून शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची उन्नती साधावी, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आज देशात महिला प्रत्येक क्षेत्रात आपल्या नावाचा वेगळा ठसा उमटवित आहेत. देशाच्या विकासात महिलांची भुमिका महत्वाची ठरत आहे. या योगदानाला सावित्रीबाई

फुले यांचा लढा प्रेरित करणारा आहे. कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फार्म शाळेत सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शेतमाल प्रकिया या विषयाचा फळे व भाजीपाला प्रकिया प्रकल्प अहवाल या कार्यक्रमांचे आयोजन सौ. पी.एस. वैरागर यांनी केले होते. यावेळी श्री. आर.ए. शिंदे आणि विद्यार्थी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हाळगाव कृषि महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी





**दि. ३ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहरी अंतर्गत असलेल्या हाळगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दत्तात्रय सोनवणे होते. यावेळी मृदा विज्ञान आणि कृषि रसायनशास्त्र सहयोगी प्राध्यापिका डॉ. प्रेरणा भोसले, विद्यार्थी परिषद सभापती कु. अनिकेत मिंड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. पोपट पवार, सहयोगी प्राध्यापक डॉ. गोकुळ वामन, कुलमंत्री डॉ. नजिर तांबोळी, सहाय्यक प्राध्यापक डॉ. मनोज गुड, डॉ. प्रणाली ठाकरे, अर्चना महाजन, डॉ. उत्कर्षा गवारे, डॉ. निकिता धाडगे, डॉ. निलेश लांडे, डॉ. महेश निकम, डॉ. अंबादास मेहेत्रे, डॉ. किरण चौधरी उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. दत्तात्रय सोनवणे म्हणाले की भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणार्या, अनेक अडचणींचा सामना करून स्त्री शिक्षणाचा पाया घट्ट रोवणार्या, सावित्रीबाई फुले यांचे जीवन संघर्षमय राहिले आहे. त्यांच्या या संघर्षमय जीवनातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेतली पाहिजे. महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, तीच खरी सावित्रीबाईंना मानवंदना राहील. डॉ. प्रेरणा भोसले यांनी आपल्या मनोगतातून सावित्रीबाईंचे क्रांतिकारी विचार पुढे नेण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. याप्रसंगी, विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयातील सर्व महिला शिक्षिकांचा सन्मान करण्यात आला. प्रथम वर्षातील विद्यार्थिनी कु. प्रगती शेंडे, कु. सना पठाण, कु. स्नेहल शिंदे, कु. अनुष्का पाटील इत्यादींनी विविध उपक्रमांत सक्रीय सहभाग नोंदवला. सदर कार्यक्रमास कृषि महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचारी श्री. महेश सुरवसे, श्री. संभाजी ठवाळ, श्री. किरण अडसुर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविण पाटील व सायली पायघन यांनी तर आभार प्रदर्शन सार्थक पाटील यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी कृषि महाविद्यालयाचे सर्व अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित राहून कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे जयंती उत्साहात साजरी







**दि. २३ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. या प्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप पाटील यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनातील विविध बोधप्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात अनमोल भूमिका पार पाडली तसेच त्यांच्या तुम मुझे खून दो, मे तुम्हे आझादी दुंगा या वचनाची आठवण करून दिली. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मानसी देसाई हिने तर आभार अनिकेत बोरसे याने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## पुरस्कार

### डॉ. अनिल दुरगुडे कै. उषा झेंडे पारितोषीकाने सन्मानीत



**दि. १६ जानेवारी, २०२५.** डॉ. अनिल गंगाधर दुरगुडे यांना सूक्ष्म अन्नद्रव्येवर केलेल्या शेतकरीभिमुख संशोधनामुळे राज्यस्तरीय परिसंवादेत कै. उषा झेंडे पारितोषीक देवून सन्मानीत करण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथील मृदविज्ञान विभागांतर्गत भारतीय मृद विज्ञान संस्था शाखा, राहुरी आणि नाबार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत शेती आणि उपजीविकेची सुरक्षासाठी मृदा व्यवस्थापन या विषयावर राज्यस्तरीय दोन दिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या राज्यस्तरीय परिषदेमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांच्या शुभहस्ते मृदाशास्त्रज्ञ डॉ. अनिल गंगाधर दुरगुडे यांना कै. उषा झेंडे पारितोषीक देवून सन्मानीत करण्यात आले. हा पुरस्कार सूक्ष्म अन्नद्रव्येमध्ये उत्कृष्ठ संशोधन लेख प्रसिद्ध होणे व सूक्ष्म अन्नद्रव्यांवर चांगले काम करणाऱ्या संशोधकांस दिले जाते. डॉ. अनिल दुरगुडे यांनी १६ वर्ष सूक्ष्मअन्नद्रव्ये योजनेत काम करून शेतकऱ्यांसाठी १२ शिफारशी दिल्या आहेत. त्यांनी व्यापारी तत्वावर फुले द्रवरुप सूक्ष्मग्रेड ग्रेड खख हे पोषक तयार केले असून त्याच्या विक्रीतून विद्यापीठाला दोन वर्षात ३.२५ कोटीचा महसूल मिळाला आहे. शेतकरी बांधव विविध पिकांसाठी सूक्ष्मग्रेड खख याचा वापर करत असतात. डॉ. दुरगुडे यांचा एकूण ३७ वर्ष संशोधनांचा अनुभव असून ॲग्रोवन दैनिकामध्ये एकुण ११२ मराठी लेखाद्वारे जमीन आरोग्य, कर्ब व्यवस्थापन आणि सूक्ष्मअन्नद्रव्याचे महत्त्व या विषयावर लेख प्रसिद्ध झाले आहेत. यापूर्वी २०२० मध्ये त्यांना मृदगंध हा पुरस्कार जमिनीच्या आरोग्याबद्दल उत्कृष्ट काम केल्यामुळे परभणी चाप्टर, भारतीय मृद विज्ञान संस्था वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने दिला आहे.

### डॉ. सुहास उपाध्ये यांना राष्ट्रीय आयएसडीए फेलो पुरस्कार प्रदान



**दि. २९ जानेवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुहास उपाध्ये (मृद व जल संधारण अभियांत्रिकी) यांना भारतीय कोरडवाहू कृषि संशोधन संस्था, हैद्राबाद मार्फत केंद्रीय कोरडवाहू कृषि संशोधन संस्था (क्रीडा), हैद्राबाद येथे आयोजित तीन दिवसीय द्वितीय आंतरराष्ट्रीय परिषदेत राष्ट्रीय स्तरावरील आयएसडीए फेलो २०२२ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हैदराबाद येथे दि. २९ ते ३१ जानेवारी रोजी कोरडवाहु शेतीः संवेदनक्षम आणि शाश्वत उपजीविकेसाठी आराखडा तयार करणे' या विषयावर तीन दिवसाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. हिमांशु पाठक यांच्या शुभहस्ते आणि नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या एन.आर.एम. विभागाचे उपमहासंचालक डॉ. एस. के. चौधरी, हैद्राबाद येथील इक्रीसॅटचे महासंचालक डॉ. स्टॅनफोर्ड ब्लेड, हैद्राबाद येथील क्रिडाचे संचालक डॉ. व्ही.के. सिंग व प्रोजेक्ट को–ऑरडीनेटर डॉ. जे.व्ही.एन.एस. प्रसाद यांच्या उपस्थितीत डॉ. सुहास उपाध्ये यांना सदरचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

वर्ष :७, अंक क्रं. : ४१, जानेवारी, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## फेब्रुवारी महिन्यातील कामांचा तपशील

### ऊस

- ❖ १२ ते १६ आठवडे झालेल्या पूर्वहंगामी ऊसाला नत्राचा तिसरा हप्ता द्यावा याकरीता हेक्टरी ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) (१.६४ पोती) वापरावे.
- ❖ पूर्व हंगामी ऊसासाठी फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवडयात संजीवकांच्या पाचव्या फवारणीसाठी हेक्टरी ५०० लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) २० ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) २० ग्रॅम, ५००० ग्रॅम १९:१९:१९, १२५० ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व २५०० ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- ❖ ऊसाची लागण सलग सरीमध्ये दोन ओळीतील अंतर मध्यम जमिनीसाठी १००-१२० सें.मी., भारी जमिनीसाठी १२०-१५० सें.मी. ठेऊन करावी अथवा ७५-१५० सें.मी. किंवा ९०-१८० सें.मी. पट्टा पध्दतीने लागण करावी.
- ❖ लागणीसाठी फुले ०२६५, को ८६०३२, फुले १०००१, फुले ०९०५७ नवीन प्रसारीत वाण फुले ११०८२, फुले ऊस १५०१२ आणि फुले ऊस १३००७ या वाणांची निवड करावी. लागणीसाठी दोन डोळ्यांच्या टिपरीचा वापर करावा.
- ❖ बेणे मळयातील १० ते ११ महिन्याचे चांगले निवडून घेतलेले रसरशीत बेणेच ऊस लागवडीसाठी वापरावे. खोडव्याचा ऊस लागणीसाठी वापरु नये. तसेच गवताळ वाढ असलेल्या प्लॉटमधील बेणे लागवडीसाठी वापरू नये.
- ❖ लागणीपूर्वी बिजप्रक्रियेसाठी १० ग्रॅ कार्बेन्डॅझिम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात बेणे १०-१५ मिनीटे बुडवावे व नंतर ॲसिटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जीवाणू अनुक्रमे १ किलो आणि १२५ ग्रॅम १० प्रति लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात टिपऱ्या ३० मिनीटे बुडवून लागणीसाठी वापराव्यात. यामुळे नत्र खताची बचत होवून स्फुरद खताची उपलब्धता वाढते.
- ❖ सुरु ऊसाच्या लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र, ६० किलो स्फुरद, ६० किलो पालाश द्यावे. तसेच सुक्ष्मअन्नद्रव्यांची कमतरता असल्यास माती परीक्षनानुसार झिंक सल्फेट २० किलो, फेरस सल्फेट २५ किलो, १० किलो मॅंगेनीज सल्फेट व बोरॅक्स ५ किलो प्रती हेक्टरी शेणखतात मिसळून सावलीत मुरवून रांगोळी पध्दतीने ४ ते ५ सें.मी. खोलीवर ही सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते द्यावीत. को ८६०३२ ऊसासाठी २५% रासायनिक खतांची जादा मात्रा द्यावी.
- ❖ मध्यम प्रतिच्या जमिनीत ओली लागण करावी. भारी व चोपण जमिनीत कोरडी लागण करावी.
- ❖ ऊस लागणीनंतर ४-५ दिवसांनी वापश्यावर हेक्टरी ५० ग्रॅम ॲट्राझिन प्रति १० लिटर पाण्यात विरघळून किंवा मेट्रीब्युझीन १५ ग्रॅ १० लिटर पाण्यात मिसळून जमिनीवर फवारणी करावी, फवारणी करतांना फवारलेली जमीन तुडवू नये.
- ❖ खोड किडीच्या नियंत्रणासाठी ऊसाच्या शेतात ट्रायकोग्रामा चिलोनिस ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी व ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) शेतात लावावे. आवश्यकता असल्यास क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल दाणेदार हे किटकनाशक १८.७५ किलो अथवा फिप्रोनिल ०.३% दाणेदार हे किटकनाशक २५ किलो प्रति हेक्टरी याप्रमाणात सरीमध्ये चळीतून द्यावे.
- ❖ भविष्यात पाण्याचा ताण पडण्याची शक्यता असल्यास म्युरेट ऑफ पोटॅशची मात्रा शिफारशीत मात्रेपेक्षा २५% नी वाढवून द्यावी.
- ❖ ऊस तोडणीनंतर पाचट सरीत दाबून घ्यावे.
- ❖ ऊसाचे बुडखे मोकळे करुन धारदार कोयत्याने जमिनीलगत छाटून घ्यावेत व त्यावर १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाचटावर प्रति हेक्टरी ८० किलो युरिया, १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट व १० किलो पाचट कुजविणारे जीवाणू शेणखतात अगर कंपोस्ट खतात मिसळून पाचटावर टाकावेत.
- ❖ रासायनिक खते व जीवाणू खते एकत्र वापरू नयेत.
- ❖ पहिले पाणी दिल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी वापसा आल्यानंतर पहारीच्या सहाय्याने हेक्टरी १२५ किलो नत्र, ५८ किलो स्फुरद, ५८ कि. पालाश या रासायनिक खताचे मिश्रण द्यावे. तसेच झिंक सल्फेट २० किलो, फेरस सल्फेट २५ किलो प्रति हेक्टरी या प्रमाणात शेणखतात मिसळून एकत्रित करुन बुडख्यापासून सरीच्या एका बाजूला १५ ते २० सें.मी. अंतरावर व १५ सें.मी. खोलीवर पहारीने छिद्र घेवून द्यावे. दोन छिद्रातील अंतर ३० सें.मी. ठेवावे.
- ❖ किडग्रस्त/तणग्रस्त लागण क्षेत्र असल्यास खोडवा ठेवू नये. तसेच कमीत-कमी हेक्टरी १ लाख ऊसांच्या रोपांची संख्या असलेल्या क्षेत्रातच खोडवा ठेवावा.
- ❖ खोडवा ऊसात गवताळ वाढीची बेटे दिसून आल्यास त्वरित काढून नष्ट करावीत.
- ❖ बांधणीच्या अवस्थेत असलेल्या आडसाली ऊसाला हेक्टरी १६० किलो नत्र (३४७ किलो युरिया) (७.७१ पोती), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) (११.८० पोती), आणि ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (३.१६ पोती) खतमात्रा देऊन बांधणी करावी. को-८६०३२ च्या ऊसासाठी २५% रासायनिक खतमात्रा जास्त वाढवून द्यावी.

### भुईमूग (उन्हाळी)

- ❖ उन्हाळी भुईमूगास जमिनीच्या मगदुरानुसार ८-१० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.
- ❖ पेरणीनंतर चाळीस दिवसापर्यंत पीक तणविरहित ठेवावे. त्यासाठी वेळोवेळी कोळपणी व खुरपणी करावी. भुईमूगाच्या आऱ्या जमिनीत शिरण्याच्या आधी पिकास भर दयावी व त्यानंतर पिकातील आंतरमशागत करावी.
- ❖ पेरणीनंतर ३० दिवसांनी हेक्टरी १२५ किलो जिप्समचा दुसरा हप्ता दयावा. जिप्समची मात्रा पिकाच्या दोन ओळीत दयावी व नंतर कोळपणीकरुन जमिनीत मिसळावे.
- ❖ पेरणीनंतर ओळीत अंतर आढळून आल्यास बी टाकून ताबडतोब नांगे भरावेत.

**हरभरा व्यवस्थापन**

❖ बागायती हरभऱ्याच्या विविध वाणांची पक्वतेनुसार काढणी व मळणी करावी.

**रब्बी ज्वारी**

❖ कणसे उन्हात वाळवून झाल्यानंतर मळणी/उफणनी करावी व साठवणुकीपूर्वी ज्वारीचे धान्य उन्हात वाळवावे व साठवणूक करावी.

**गहू**

❖ जरूरी भासल्यास तांबेरा रोग नियंत्रणासाठी दुसरी फवारणी पहिल्या फवारणी नंतर १५ दिवसाच्या अंतराने करावी.

❖ उंदरांच्या नियंत्रणासाठी विषारी आमिषांचा वापर करावा. आमिष तयार करण्याकरिता कोणत्याही धान्याचा जाडाभरडा ५० भाग त्यात एक भाग झिंक फॉस्फाईड मिसळावे. यामध्ये थोडेसे गोडेतेल टाकून चांगल्या प्रकारे मिश्रण तयार करुन प्रत्येक बिळामध्ये साधारणपणे एक चमचा मिश्रण काठीच्या सहाय्याने खोलवर टाकावे व बिळे पालापाचोळा व गवत टाकून झाकून घ्यावीत व बिळांची तोंडे चिखलाने बंद करावीत. तसेच पिंजऱ्याचा उपयोग करून उंदीर पकडावेत.

❖ गहू पीक पक्व होण्याच्या २–३ दिवस अगोदर पिकाची कापणी केल्याने गव्हाचे दाणे शेतात झडण्याचा प्रकार आढळत नाही.

❖ कापणीच्या वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्के असावे.

❖ गहू बियाणे साठवणूकीच्या काळात सोंडे किडीच्या नियंत्रणासाठी उन्हात वाळविलेल्या बियाण्यास प्रति किलो १० ग्रॅम वेखंड भुकटीची बीजप्रक्रिया करावी.

**फळबाग व्यवस्थापन**

❖ डाळिंब–नत्राचा उर्वरीत हप्ता द्यावा, फुलकिडीचे जैविक पध्दतीने नियंत्रण करुन मधमाशी संवर्धन करावे, तेल्या रोगाचा प्रार्दुभाव टाळणे हंगामी प्रतिबंधात्मक उपाय योजना कराव्यात.

❖ सिताफळ – बिगर हंगामी लवकर फळे मिळण्यासाठी बागेत झाडांभोवती बाजरीची पेरणी करावी. शिफारशीत खतांच्या मात्रा द्याव्यात.

❖ बोर– पक्व फळांची काढणी करावी.

❖ आवळा –बागेची स्वच्छता करावी.

❖ अंजीर– बागेची स्वच्छता करावी.

❖ जांभूळ– उर्वरीत खताची मात्रा द्यावी.

❖ मोसंबी–आंबे बहारासाठी शिफारशीत खतमात्रा (८००:३००:६०० ग्रॅम नत्र स्फुरद, पालाश) २० किलो शेणखत, १५ किलो निंबोळी पेंड प्रति झाड द्यावे.

❖ मोसंबी कागदी लिंबू – झाडास दुहेरी आळे पध्दतीने पाणी द्यावे. कँकर / खैऱ्या रोग : कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यातुन फवारावे. आंबे बहाराचे प्रभावी परागीभवनासाठी मधमाशीच्या २ पेट्या प्रति हेक्टरी ठेवाव्या.

**पाणी परिक्षण**

❖ बागायत क्षेत्रातील विहीरीतील किंवा कुपनलिकेतील पाणी पिण्यास मचुळ लागल्यास विद्राव्य क्षारांचे प्रमाण वाढल्याचे समजावे. या पाण्याची प्रयोगशाळेत तपासणी केल्यास क्षारांचे प्रमाण किती आहे हे समजते. पाणी क्षारयुक्त असल्यास पिकांच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो. अशा पाण्यातून जमिनीचा निचरा चांगला होत नसल्यास क्षारांचे प्रमाण वाढत जाते. पाण्याचे बाष्पीभवन होवून विद्राव्य पांढरेक्षार जमिनीच्या पृष्ठ भागावर साठतात. यालाच आपण जमिनीला मीठ फुटले असे म्हणतो. या जमिनी क्षारयुक्त बनतात. पाण्यामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम, क्लोराईड व सल्फेट या उदासीन क्षारांचे प्रमाण जास्त असल्यास जमिनीची घडण भुसभुसीत वाटते, परंतु पिकांच्या मुळांची वाढ खुटूंन पिके पिवळी पडतात. पाण्यामध्ये सोडियम क्षार हे कार्बोनेट किंवा बायकार्बोनेट सारख्या अणुबरोबर असल्यास जमिनीची घडण अतिशय कठीण होते. त्यासाठी पाण्यामध्ये कोणत्या प्रकारचे क्षार आहेत हे पाणी परिक्षणाद्वारे प्रयोगशाळेत समजते.

❖ पाणी नमुना घेण्याची पध्दत पाणी पृथ:करणासाठी एक लिटर पाणी पुरेसे होते. पाणी स्वच्छ प्लॅस्टिक बाटलीत घ्यावे. बाटली साबण/डिटर्जंट पावडरने धुवू नये. विहीरीतील किंवा कुपनलीकेतुन पाणी घेताना विद्युतपंप सकाळी १५ ते २० मिनिटे चालवावा. नदी, ओढे व कॅनॉलमधील पाणी नमुना वाहत्या पाण्यामधुन घ्यावा. पाण्यात तरंगणारे शेवाळ, काडीकचरा गाळुन पाणी बाटलीत भरावे. घट्ट झाकण बसवुन नमुना प्रयोगशाळेत ४८ तासाच्या आत पाठवावा. बाटलीसोबत शेतकऱ्याचे नाव, पत्ता, नमुना घेतल्याची दिनांक, नमुना कशातून घेतला याबाबत माहीतीसह पाठवावा.

**क्षारयुक्त पाणी जमिनीस वापरताना घ्यावयाची काळजी**

❖ हलक्या ते मध्यम चांगला निचरा असलेल्या जमिनीस क्षारयुक्त पाणी वापरावे. काळ्या खोल जमिनीस बाजुने चर खोदुन अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

❖ सेंद्रिय खतांचा (शेणखत, कंपोस्टखत, गांडुळखत इ.) वापर प्रत्येक पिकास शिफारसी नुसार करावा.

❖ दोन ते तीन वर्षातुन एकदा तरी धैंचा किंवा ताग जमिनीत फुले सुरु होताच गाडावा.

❖ क्षारयुक्त पाणी चांगले पाण्यात मिसळून पिकांना दयावे किंवा आलटुन पालटुन दयावे.

❖ क्षारयुक्त पाण्याचा वापर अमर्याद न करता मर्यादीत हलके परंतु वारंवार दयावे.

❖ तुषार किंवा ठिबकसिंचनाद्वारे पिकांना पाणी दयावे.

- ❖ पेरणीसाठी बियाणांचा १५ ते २० टक्के शिफारसीपेक्षा जास्त वापर करावा.
- ❖ पिकांची लागवड सपाट वाफ्यात न करता सरी वरंबा पध्दतीने करुन लागवड वरब्यांच्या बगलात करावी.
- ❖ क्षार प्रतिकारक पिकांची निवड करावी उदा. गहु, बाजरी, मका, वारी, सोयाबीन, कापुस, ऊस, वांगे, कोबी, पालक, शुगरबीट, आवळा, पेरु, चिक्कू इ.
- ❖ मात्र क्षारसंवेदनशील पिकांची लागवड करु नये. उदा. वाटाणा, मुग, उडीद, चवळी, तीळ, घेवडा आणि लिंबुवर्गीय फळपिके (संत्रा, मोसंबी, लिंबू), स्ट्रॉबेरी इ. अशाप्रकारे पाण्यात क्षार असल्यास वरीलप्रमाणे बाबींचा अवलंब करुनच मचुळ पाण्याचे व्यवस्थापन करावे.

### आले

- ❖ लागवडीसाठी निवड केलेला प्लॉट १००% सुप्त अवस्थेत गेल्यानंतर फेब्रुवारी महिन्यात बियाणे काढणी प्रक्रिया करावी.
- ❖ काढलेल्या बियाण्यास सुर्यप्रकाशाची तीव्रता मिळणार नाही याची काळजी घ्यावी.
- ❖ काढलेले बियाणे थोडेफार ओलसर असते ते झाडांच्या किंवा छपराच्या सावलीत सुकवावे. हे सुकलेले बियाणे निवड करुन (खराब तुकडे,जुन्या बियाणांचा तुकडा) थंड ठिकाणी छपराच्या किंवा कौलारु घरात आढी लावून त्यावर गोनपाटाचे बारदानाने पूर्णपणे झाकून ठेवावे.
- ❖ आढी लावताना त्यास मुंग्या, वाळवी व इतर किड रोगांपासून संरक्षित राहील याची काळजी घ्यावी.
- ❖ आढीत ठेवलेले बियाणे दोन ते अडीच महिन्यापर्यंत सुरक्षित राहु शकते.
- ❖ आढीत ठेवलेले बियाण्यास वरुन पाणी मारु नये व जमीन ओली होणार नाही याची अत्यंत काळजी घ्यावी. बियाणे आढीत ठेवल्यानंतर हळू हळू तापमान वाढण्यास सुरूवात होते. बियाणे हळूवार सुकण्यास सुरूवात होते व नवीन डोळे फुटण्याची क्रिया चालू होते. अशाप्रकारे बियाणांची साठवण करावी.

### दुधाळ देशी गोवंश

- ❖ भारतामध्ये एकुण ५३ देशी गोवंश आहेत.
- ❖ भारतामध्ये प्रामुख्याने दुधासाठी प्रसिध्द असणारे गोवंश

### सहिवाल गाय

- ❖ उपनांवे : मुलतानी, लोला, मोंटगोमेरी, लांबीबार
- ❖ मुळस्थान : सीमा भागातील पंजाब, मोंटगोमेरी आणि मुलतान प्रांत तसेच पाकिस्तानमधील पंजाबमधून देशातील इतर राज्यात नेवून सांभाळल्या जातात
- ❖ शारिरीक वैशिष्ट्ये : लालरंग,लोंबती कातडी, आखुड कानावर गोल वळलेली शिंगे, लोंबती गळापोळी आणि बेंबट लांब, चाबकासारखे शेपूट, बैलामध्ये मोठे वशिंड
- ❖ वजन : बैल : ५५० किलो, गाय : ३००–३५० किलो
- ❖ वेतातील सरासरी दुग्धोत्पादन : २३२५(१६००–२७५०) लिटर
- ❖ दुधातील स्निग्धांचे प्रमाण : ४.९ (४.८–५.१)%
- ❖ उपलब्धता : एन. डी. आर. आय. कर्नाल (हरीयाना राज्य), तसेच पंजाबमधील खाजगी गोठ्यातून गायी मिळतात

### लाल सिंधी गाय

- ❖ उपनांवे : लाल कराची, सिंधी
- ❖ मुळस्थान : पंजाब, सिंध, हैद्राबाद प्रांत – कराची (पाकिस्तान)
- ❖ शारिरीक वैशिष्ट्ये : बुटकी मध्यम आकाराची गाय, शांत गरीब स्वभाव, लालरंग, जाड बुटकी गोल शिंगे, टोकास बोथट
- ❖ वजन : बैल : ४५० किलो, गाय : २५०–३०० किलो
- ❖ वेतातील सरासरी दुग्धोत्पादन : १८४० (११००–२६००) लिटर
- ❖ दुधातील स्निग्धांचे प्रमाण : ४.५ (४ –५.२) %
- ❖ उपलब्धता : कालसी, देहरादून, कृषि महाविद्यालय, धुळे

### गीर गाय

- ❖ उपनांवे : भोदली, देसण, गुजराती, काठियावाडी, सोरटी, सुरती
- ❖ मुळस्थान : गीर जंगल, गुजरात, दक्षिण काठेवाड, जुनागड
- ❖ शारिरीक वैशिष्ट्ये : रंग लाल पांढरा, काळे तांबडे ठिपके,उठावदार कपाळ, त्यात डुंबलेले काळेभोर डोळे, लांबट तोंड, गोल वर्तुळकार शिंगे, लोंबलेले–लांब कान, दोन्ही कानाची टोके तोंडाच्या खाली जबडयाजवळ पोहचलेली. शेपूट लांब, वळूमध्ये मोठे वशिंड, बैल शेतकामासाठी चांगले.
- ❖ वजन : बैल : ५५० किलो, गाय : ३५०–४५० किलो
- ❖ वेतातील सरासरी दुग्धोत्पादन : २१००(८००–३३००) लिटर

- दुधातील स्निग्धांचे प्रमाण : ४.६ (३.९-५.१)%
- उपलब्धता : शासकीय जुनागड फार्म, अहमदाबाद, गुजरात राज्यातील विविध गोशाळा.

### राठी गाय

- उपनांवे : राठ सहिवाल, रेड सिंधी आणि थारपारकर यांचा संकर
- मुळस्थान : राजपूताना भाग, राजस्थान, अलवार जिल्हा, बिकानेर जिल्हा
- शारिरीक वैशिष्ट्ये : मध्यम, मजबूत शरीराची ठेवण, साधारणतः हरीयाना जाती प्रमाणे सरळ चेहरा, पसरट कपाळ, मोठे टपोरे डोळे, लहान लोबणारे कान, गोंडा, शरीराचा रंग पांढरा किंवा थोडा करडा, लाल काळे ठिपके
- वजन : बैल : ३८०-४०० किलो, गाय : ३२०-३५० किलो
- वेतातील सरासरी दुग्धोत्पादन : १५६० (१०६२-२८१०) लिटर
- दुधातील स्निग्धांचे प्रमाण : ३.९ (३.७-४.१) %

### थारपारकर गाय

- उपनांवे : थारी, पांढरीसिंधी, कोझीसिंधी
- मुळस्थान : राजस्थानातील कच्छ, मारवाड, थार वाळवंट व पाकिस्तान सीमेलगत तसेच पाकिस्तानातील हैद्राबाद प्रांत
- शारिरीक वैशिष्ट्ये : मध्यम, मजबूत बांधा, आखूड मजबूत पात्र, खोलगट कपाळ, पाढरा- करडा रंग,लांब शेपूट त्यास काळा गोंडा, चांगली वाढलेली कास व त्यास ३-४ इंच लांब सडे
- वजन : बैल : ४५०-५०० किलो, गाय : ४०० किलो वेतातील सरासरी दुग्धोत्पादन : १७४९(९१३-२१४७) लिटर
- दुधातील स्निग्धांचे प्रमाण : ४.८८ (४.७२-४.९) %


**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण

**प्रमुख संपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

**सहसंपादक** : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र

**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक-नि-टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७६९/२०२५**